महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २२१ वे | दिनांक : ०६/०८/२०२६ | वार : गुरुवार

## सावजी मटण वादावर तुकाराम मुंढेंचा ठाम पवित्रा; माफी मागणार नाही



**मुंबई :** राज्यात बनावट आणि भेसळयुक्त अन्नपदार्थांवर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) मोठी कारवाई सुरू केली आहे. याच धर्तीवर राज्यात अॅनालॉग पनीरवर वर्षभरासाठी बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या कारवाईचा आढावा घेण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सावजी जेवणावरून उठलेल्या वादावर आपली भूमिका मांडली.

अमरावती येथील एका कार्यक्रमात आरोग्याबाबत बोलताना "मी सावजी खाल्ले तर महिनाभर रुग्णालयात पडावे लागेल," असे विधान मुंढे यांनी केले होते. या विधानावरून नागपुरातील हॉटेल व्यावसायिक आणि हलबा समुदायाच्या उद्योजकांनी तीव्र आक्षेप घेतला होता. मुंढेंनी आपल्या परंपरेचा अवमान केल्याचा आरोप करत माफीची मागणी केली होती आणि त्यांना सावजी जेवणाचे आमंत्रणही दिले होते.

या वादावर स्पष्टीकरण देताना तुकाराम मुंढे म्हणाले, "माझे वक्तव्य नीट ऐकल्यास लक्षात येईल की ते पूर्णपणे माझे वैयक्तिक मत होते. मी कोणालाही सावजी खाऊ नका असा सल्ला दिला नाही किंवा इतर कोणी आजारी पडेल असे म्हटले नाही. 2008-09 मध्ये एका मित्रासोबत गेलो असताना अतितेलकट आणि तिखट अन्नामुळे मी तो पदार्थ टाळला होता. हा माझा वैयक्तिक अनुभव होता. त्यामुळे या प्रकरणात माफी मागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही."

छत्रपती संभाजीनगर येथील एफडीए लॅबमधील कर्मचाऱ्यांना सुट्ट्या मिळत नसल्याच्या आरोपांवर मुंढे यांनी स्पष्ट केले की, प्रयोगशाळा 24 तास सुरू राहत असली तरी कर्मचाऱ्यांना आठवड्याला 48 तास काम आणि एक दिवस साप्ताहिक सुट्टी दिली जाते. सरकारी कामाची वेळ फक्त 'सकाळी 10 ते संध्याकाळी 6' असावी हा अट्टाहास चुकीचा असून कर्मचाऱ्यांचे गैरसमज दूर केले जातील.

कोणतीही नोटीस न देता अन्न आस्थापनांचे परवाने रद्द केले जात असल्याच्या तक्रारींवर बोलताना त्यांनी सांगितले, "जिथे नागरिकांच्या जिवाला थेट धोका निर्माण झाला होता किंवा अन्नपदार्थ अत्यंत अस्वच्छ होते, तिथेच थेट परवाना जप्तीची कडक पावले उचलली गेली आहेत. या कारवाईविरोधात व्यावसायिकांना अपील करण्याचा कायदेशीर अधिकार आहे."

कारवाई झालेल्या 165 पैकी 103 आस्थापनांनी आयुक्तांकडे अपील केले आहे. एफडीकडे सर्व प्रकारच्या कारवायांचे फोटो, व्हिडिओ आणि ठोस पुरावे उपलब्ध असून विभाग पूर्णपणे कायदेशीर चौकटीत राहूनच काम करत आहे, असेही त्यांनी ठामपणे नमूद केले.

“माझ्यासारख्या माणसाने सावजीचे जेवण केले तर किमान महिनाभर रुग्णालयात भरती व्हावे लागेल...’ असा अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या अमरावतीतील वक्तव्याचा व्हिडिओ सोमवारी व्हायरल झाला. यानंतर नागपुरातील सावजी हॉटेल व्यावसायिक आक्रमक झाले आहेत. “सावजी हा केवळ पदार्थ नसून आमची परंपरा आहे,’ असे सांगत हलबा उद्योजक ग्रूपचे संस्थापक प्रवीण सोरते आणि स्थानिक सावजी व्यावसायिकांनी मुंढेंना सार्वजनिक माफी मागण्याची मागणी केली असून तसे न केल्यास कायदेशीर नोटीस पाठवण्याचा इशारा दिला आहे.

## वीज खासगीकरणाविरोधात राज्यभर एल्गार!



**नागपुर :** महावितरणमधील संभाव्य फ्रँचायझीकरण, महाजेन्कोचे वीज निर्मिती संच बंद करणे आणि जलविद्युत प्रकल्पांचे खासगीकरण यांसारख्या धोरणांविरोधात राज्यभरातील सुमारे ८,६०० वीज कर्मचाऱ्यांनी ५ ऑगस्ट रोजी आक्रमक निदर्शने केली. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी याप्रश्नी सकारात्मक चर्चा करून बैठकीचे आश्वासन दिल्याने कर्मचाऱ्यांनी नियोजित उपोषण १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत तात्पुरते स्थगित केले आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीच्या बॅनरखाली हे राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात आले. २ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींशी सकारात्मक चर्चा केली आणि पुढील दोन आठवड्यांत या गंभीर विषयावर सविस्तर बैठक घेण्याचे आश्वासन दिले. यामुळे ५ ऑगस्टपासून सुरू होणारे उपोषण १७ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय कृती समितीने घेतला.

कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर, दीपनगर, एकलहरे, पारस आणि परळी वैजनाथ या ७ प्रमुख वीज निर्मिती केंद्रांवर कर्मचाऱ्यांनी तीव्र निदर्शने केली. याशिवाय नागपूर, गोंदिया, नाशिक, पुणे, ठाणे, औरंगाबाद आणि कोल्हापूर या सर्व परिमंडळ कार्यालयांसमोर जोरदार द्वार सभा घेऊन कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्या प्रशासनासमोर मांडल्या.

कृती समितीने शासनासमोर एकूण १६ प्रमुख मागण्यांची सनद मांडली आहे. यामध्ये प्रामुख्याने:

महावितरणमधील संभाव्य फ्रँचायझीकरण पूर्णपणे रद्द करणे.

महाजेन्कोचे वीज निर्मिती संच बंद न करणे.

कॅटेगरी-२ मधील जलविद्युत प्रकल्प खासगी क्षेत्राकडे हस्तांतरित न करणे.

अदाणी पॉवर प्रकरणातील MERC च्या आदेशाविरोधात कायदेशीर पर्यायांचा वापर करणे.

तिन्ही सरकारी वीज कंपन्यांमध्ये शासकीय भांडवली निधी वाढवणे.

कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे आणि रोखलेला बोनस त्वरित जाहीर करणे.

मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनामुळे उपोषण तात्पुरते स्थगित केले असले तरी, दिलेल्या दोन आठवड्यांच्या मुदतीत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा न निघाल्यास हे आंदोलन राज्यभरात अधिक तीव्र केले जाईल, असा स्पष्ट इशारा महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे सरचिटणीस कृष्णा भोयर यांनी कृती समितीतर्फे दिला आहे.

## CJP राजकीय पक्ष बनणार नाही: अभिजित दिपके

**छत्रपती संभाजीनगर :** नीट (NEET) पेपरफुटी प्रकरणी जंतर-मंतरवर यशस्वी आंदोलन उभारणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या (CJP) कोअर कमिटीची दोन दिवसीय बैठक छत्रपती संभाजीनगरमध्ये पार पडत आहे. या बैठकीपूर्वी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी देशातील सद्य राजकीय आणि न्याय व्यवस्थेवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. तसेच, देशातील विविध संस्थांची 'अकाउंटेबिलिटी' (उत्तरदायित्व) आणि 'निष्पक्षता' परत आणण्यासाठी देशव्यापी जनआंदोलनाची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अभिजीत दिपके यांच्या निवासस्थानी सुरू असलेल्या या बैठकीसाठी कॉकरोच जनता पार्टीचे सौरव दास, यतीन गोयल , वैष्णवी गौर, रत्ना सिंग, अक्षय मराठे, अजिंक्य शिंदे आणि आशुतोष रंका हे पदाधिकारी उपस्थित आहेत.बैठकीपूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत अभिजीत दीपके म्हणाले की, जंतर-मंतरवरील आंदोलनाला मिळालेला पाठिंबा केवळ शिक्षण व्यवस्थेपुरता मर्यादित नव्हता, असे दीपके यांनी स्पष्ट केले. “सध्या देशातील राजकीय व्यवस्था (Political System), न्यायव्यवस्था (Judiciary), प्रसारमाध्यमे (Media), शिक्षण व्यवस्था आणि निवडणूक आयोग (Election Commission) यांसारख्या सर्वच महत्त्वाच्या संस्थांवरून जनतेचा विश्वास उडाला आहे. लोकांच्या मनात असलेला हा राग जंतर-मंतर, बंगाल, मुंबई आणि चेन्नईसह देशभरात दिसून आला.”सध्याच्या राजकीय परिस्थितीवर बोलताना दीपके यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, "आज राजकीय व्यवस्था खूपच खराब झाली आहे. जनता सकाळी एकाला मतदान करते, मात्र संध्याकाळी भलत्याच कुणाचे तरी सरकार स्थापन होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०६ ऑगस्ट २०२६


## वक्ता धाराशिवचा आवाज तरुणाईचा वक्तृत्व स्पर्धेत शिवाजी महाविद्यालयाची अमृता खटके प्रथम




**उमरगा :** विलासराव देशमुख सेंटर, धाराशिव यांच्या वतीने 'वक्ता धाराशिवचा आवाज तरुणाईचा' या उपक्रमांतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'राजकारणातील लोकशाही मूल्ये : आजच्या काळाची गरज', 'डिजिटल युगातील माध्यम साक्षरता' आणि 'युवक आणि नेतृत्व : आजची प्राथमिकता, उद्याचे भविष्य' या विषयांवर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण व प्रभावी विचार मांडले.स्पर्धेच्या माध्यमातून युवकांच्या मनातील सामाजिक, राजकीय आणि राष्ट्रीय विषयांवरील विचारांना व्यासपीठ मिळाले. लोकशाही मूल्यांचे संवर्धन, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, माहितीची सत्यता तपासण्याची गरज तसेच देशाच्या भवितव्यामध्ये युवकांची वाढती भूमिका या विषयांवर स्पर्धकांनी परखडपणे आपली मते मांडली.स्पर्धेत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील खटके अमृता गुंडेराव यांनी प्रथम क्रमांक पटकावत रुपये २,५०० व स्मृतिचिन्ह मिळविले. बी.एस.एस. महाविद्यालय, माकणी येथील मुगळे सुप्रिया नेताजी यांनी द्वितीय क्रमांक मिळवून रुपये १,५०० व स्मृतिचिन्ह, तर भानुदासराव चव्हाण महाविद्यालय, लोहारा येथील जावळे संजना यांनी तृतीय क्रमांक मिळवून रुपये १,००० व स्मृतिचिन्ह पटकावले. श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी येथील म्हेत्रे आकांक्षा यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.यावेळी मा. रवींद्र केसकर यांनी मनोगत व्यक्त करताना, युवकांनी केवळ वक्तृत्वकलेपुरते मर्यादित न राहता समाजातील प्रश्न समजून घेऊन त्यावर विधायक भूमिका घ्यावी, असे आवाहन केले. विचारांची स्पष्टता, अभ्यासाची खोली आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम झाला तर तरुणाई परिवर्तनाची प्रभावी शक्ती ठरू शकते, असे त्यांनी नमूद केले. आजच्या डिजिटल युगात युवकांनी माध्यमांचा विवेकपूर्ण वापर करून सत्य-असत्याची पडताळणी करावी आणि लोकशाही मूल्ये अधिक बळकट करण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा. रवींद्र केसकर व मा. प्रशांत पाटील उपस्थित होते. यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अर्जुन बिराजदार, उपनगराध्यक्ष विजय वाघमारे, मा. बाबा औटी, नगरसेवक बाबा मस्के, रेखाताई सूर्यवंशी, ॲड. जान्हवी कोथिंबीरे, आदर्श कोथिंबीरे, अभिषेक, अभिषेक औरादे, उपप्राचार्य विनोद देवरकर, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, पर्यवेक्षक शैलेश महामुनी आणि डॉ. श्रीशैल्य तोडकर यांची उपस्थिती होती.स्पर्धेचे परीक्षण डॉ. ढोबळे डी. बी. व श्री. अविनाश काळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित रेड्डी यांनी केले.

## पुणे-नाशिक महामार्गावर भीषण अपघात



**पुणे :** पुणे-नाशिक महामार्गावरील चाकणजवळील वाकी परिसरात आज पहाटे कंटेनर, टेम्पो आणि कार यांच्यात भीषण अपघात झाला. भरधाव कंटेनर आणि टेम्पोची जोरदार धडक झाल्यानंतर टेम्पो थेट जवळ उभ्या असलेल्या कारवर पलटी झाला. धडकेची तीव्रता इतकी होती की कंटेनरही महामार्गावर आडवा झाला. या अपघातामुळे पुण्याकडे जाणारी वाहतूक काही काळ पूर्णपणे विस्कळीत झाली. मिळालेल्या माहितीनुसार, पहाटेच्या वेळी कंटेनर आणि टेम्पोमध्ये भीषण टक्कर झाली. या धडकेनंतर नियंत्रण सुटलेला टेम्पो थेट शेजारी असलेल्या एका कारवर जाऊन उलटला. तर, अपघाताच्या तीव्रतेमुळे मोठा कंटेनर महामार्गाच्या मधोमध आडवा झाला. हा अपघात नेमका सकाळच्या वेळी घडल्याने कामावर जाणाऱ्या चाकरमान्यांचे आणि प्रवाशांचे मोठे हाल झाले. कंटेनर रस्त्यावर आडवा झाल्याने पुण्याकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे खोळंबली. त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या अनेक किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र होते.या भीषण अपघातात तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे, मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. क्रेनच्या मदतीने रस्त्यावरील अपघातग्रस्त वाहने हटवून महामार्गावरील वाहतूक लवकरात लवकर पूर्ववत करण्याचे प्रयत्न पोलिसांकडून युद्धपातळीवर सुरू आहेत.

## पुतण्याच्या तोंडात फेविक्विक; काकूसह तिघांवर गुन्हा




**पुणे :** लोहगाव येथे कौटुंबिक वादातून काकूने 9 महिन्यांच्या पुतण्याच्या तोंडात फेविक्विक ओतले. यामुळे बालकाच्या तोंडात जखमा झाल्या असून त्याच्यावर ससून रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. अल्ताफ नबी शेख (39, रा. कलवड वस्ती, लोहगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सानिया शेख (रा. लोहगाव), रियाज इमाम हल्याळ आणि हाजी मलंग शेख (दोघे रा. मुंबई) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. अल्ताफ आणि त्यांचा भाऊ कुटुंबासह लोहगावमध्ये एकत्र राहतात. त्यांच्यात किरकोळ कारणांवरून नेहमी वाद होत होते. यातूनच 31 जुलै रोजी दुपारी 12 वाजेच्या सुमारास भावजयी सानिया हिने अल्ताफ यांच्या मुलाच्या तोंडात फेविक्विक ओतले. मुलाची आई जैनब यांच्या ही बाब निदर्शनास येताच त्या घाबरल्या. त्यांनी तातडीने कामावर असलेल्या पतीशी संपर्क साधला आणि बाळाला ससून रुग्णालयात दाखल केले. फेविक्विकचा मुख्य आणि सक्रिय रासायनिक घटक इथाइल सायनो ॲक्रिलेट आहे. हे रसायन द्रवरूपात असते. ते त्वचेला अत्यंत घट्ट चिकटते. त्यामुळे त्वचा ओढली जाऊनही जखम होऊ शकते. दरम्यान, जैनबला धमकावल्याप्रकरणी सानिया व तिचे मुंबईतील नातेवाईक यांच्याविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर), पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G. — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN — कालावधी २ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर), पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०६ ऑगस्ट २०२६


## बरसल्या जलधारा

काळया काळया ढगातून,
बरसल्या जलधारा.
नदी नाले वाहतांना,
आला सोसाट्याचा वारा. १

खळखळ खळखळ,
वाहे झुळझुळ पाणी.
आनंदाने गात बसू,
निसर्गाची दोघं गाणी. २

गार गार वाऱ्यासंगे,
आले पावसाच्या धारा.
असा कसा अचानक
जोरदार आल्या गारा. ३

जोरदार पावसाने,
दाणादाण उडविले,
झोपेतून उठलेल्या,
माणसांना पळविले. ४

पुन्हा आल्या जलधारा,
चला चला नाचू गाऊ,
माळरानी आनंदाने,
भिजायला पुन्हा जाऊ. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन


X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत जि.प. उर्दू प्राथमिक शाळा, वाळूजचे उल्लेखनीय यश




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, वाळूज येथील विद्यार्थ्यांनी इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.या परीक्षेत बैग असद अरशद यांनी ३०० पैकी २१६ गुण (७२.०० टक्के) मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच सय्यद उम्मे रोमान जावेद यांनी २०८ गुण, सय्यद मरिया खालिद यांनी २०० गुण, शेख आयेशा रज्जाक यांनी १७२ गुण आणि सय्यद मधीहा अलीम यांनी १४८ गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची सातत्यपूर्ण मेहनत, पालकांचे प्रोत्साहन आणि शिक्षकांचे योग्य नियोजन व मार्गदर्शन असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. नियमित सराव, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी शाळेत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा या यशात मोठा वाटा असल्याचे शिक्षकांनी सांगितले.या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती नाजिया खानम नसीर खान यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच वर्गशिक्षिका श्रीमती कनीज फातेमा सय्यद अहमददोदीन यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यातही अशीच उज्ज्वल कामगिरी करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.यावेळी शाळेतील सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले. पालक आणि ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल आनंद व्यक्त करत शाळेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## डार्क वेबवरील ‘क्राइम जीपीटी’ ठरतेय गुन्हेगारांचे नवे हत्यार

**मुंबई** : तंत्रज्ञानाच्या जगात क्रांती घडवणारी ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स’ (एआय) आता सायबर गुन्हेगारांचे अत्यंत घातक हत्यार बनली आहे. डार्क वेबवर ‘क्राइम जीपीटी’सारखी बेकायदेशीर साधने अत्यंत कमी दरात सहज उपलब्ध आहेत. यामुळे तांत्रिक ज्ञान नसलेली कोणतीही व्यक्ती आता सहजपणे क्लिष्ट सायबर हल्ले करू लागली आहे. बनावट ई-मेल किंवा आवाजाची नक्कल करणे एआयमुळे काही सेकंदांत शक्य झाले आहे. सामान्य लोक अशा बनावट लिंक्सवर नेहमीपेक्षा चार पट अधिक वेगाने क्लिक करत असल्याने फसवणुकीचे प्रमाण वाढले आहे. 429 सोशल मीडिया हँडल्सवर कारवाई: या संकटाची भीषणता महाराष्ट्र सायबर पोलिसांनी केलेल्या कारवाईतून स्पष्ट होते. राजकीय नेते आणि व्हीआयपी व्यक्तींचे बनावट व्हिडिओ पसरवणाऱ्या 429 सोशल मीडिया खात्यांवर कारवाई केली असून 140 पेक्षा जास्त एआय-डीपफेक प्रोफाइल्स हटवले. व्हॉइस क्लोनिंग : 3 ते 5 सेकंदांचे व्हॉइस सॅम्पल वापरून कोणाचाही हुबेहूब आवाज तयार करता येतो. डीपफेक आणि इमेज जनरेटर : केप्रॉम्प्ट देऊन कोणत्याही व्यक्तीचा बनावट आणि अश्लील फोटो तयार केला जातो. फेस स्वॅप : इंटरनेटवरील मोफत साधनांद्वारे एका व्यक्तीचा चेहरा दुसऱ्याच्या शरीरावर लावून बनावट व्हिडिओ बनवतात. एआयमुळे गुन्हेगाराला कोडिंग शिकण्याची गरज उरलेली नाही. अँटिव्हायरससारखी पारंपरिक साधने या हल्ल्यांना रोखण्यासाठी आता सक्षम नाहीत. सुरक्षा यंत्रणेतही प्रगत स्वयंचलित एआय तंत्रज्ञानाचा वापर करणे आता अधिक आवश्यक झाले आहे. अॅड. महेंद्र लिमये, सायबर सुरक्षा सल्लागार

## गॅस एजन्सीच्या मनमानीविरोधात विजय म्हस्के आक्रमक; ४० गावांतील ग्राहकांच्या न्यायहक्कासाठी प्रशासनाला इशारा

**छत्रपती संभाजीनगर** : लाडसावंगी येथील 'शिवसमर्थ गॅस एजन्सी' मागील सहा महिन्यांपासून बंद असल्याने परिसरातील ४० गावांतील हजारो ग्राहकांची भीषण कोंडी होत आहे.या गंभीर प्रश्नावर केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन आक्रमक भूमिका घेतली आहे.गॅसअभावी नागरिकांची काळ्या बाजारात आर्थिक लूट होत असून,चालक फरार आणि पुरवठा विभाग सुस्त असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.विजय म्हस्के यांनी ही एजन्सी तातडीने पूर्ववत सुरू करावी,तोपर्यंत ग्राहकांचे जोडणी (Tagging) दुसऱ्या एजन्सीशी जोडावे आणि दोषी चालक व अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी,अशी ठाम मागणी प्रशासनाकडे केली आहे.

## महागाईचा तडाखा; तेल, डाळी, दूध महाग!

**मुंबई** : शनिवार, 28 फेब्रुवारी म्हणजेच ज्या दिवशी अमेरिका-इराण युद्ध सुरू झाले होते... त्या दिवसापासून सोमवार, 3 ऑगस्टपर्यंत सामान्य माणसाचा खाण्यापिण्याचा खर्च वेगाने वाढला आहे. ग्राहक व्यवहार विभागाच्या प्राइस मॉनिटरिंग सिस्टिमनुसार, या काळात 16 पैकी 15 प्रमुख खाद्यवस्तूंचे भाव वाढले आहेत. यातही सर्वात जास्त वाढ डाळी आणि तेलामध्ये झाली आहे. हरभरा डाळ 4.65 रुपये, तूर डाळ 5.96 रुपये, उडीद 5.71 रुपये, साखर 2.25 रुपये, मूग डाळ 4.55 रुपये प्रतिकिलोने महागली आहे. तसेच दूध 3 रुपये आणि मोहरीचे तेल 7.56 रुपये प्रतिलिटरने महागले आहे. तांदळाचे भाव 1.57 रुपये आणि मिठाचे भाव 0.85 रुपये प्रतिकिलोने वाढले. तज्ज्ञांच्या मते, डाळींच्या किमती वाढण्याचे कारण यंदाचा कमकुवत आणि लहरी मान्सून आहे. जुलैअखेरीस खरीप डाळींची पेरणी मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे 7% कमी झाली. उत्पादनात घट आणि आयात वाढण्याच्या शक्यतेने बाजारात किमती वाढल्या. मोठे कारण- इराण युद्ध, कमकुवत मान्सून व जगभरात वाढलेले भाव तज्ज्ञांच्या मते, डाळी आणि खाद्यतेलांच्या किमतीवर अद्यापही दबाव कायम आहे. कमकुवत मान्सूनमुळे खरीप पेरणीचे क्षेत्र घटल्याने डाळींच्या उत्पादनाबाबत चिंता वाढली आहे. तसेच खाद्यतेलांबाबत भारताचे आयातीवरील अवलंबित्व, आंतरराष्ट्रीय बाजारात पाम आणि सोया तेलाच्या किमतीत झालेली वाढ आणि पश्चिम आशियातील भू-राजकीय तणावामुळे आयातीचा खर्च वाढला आहे. पुढे काय? ऑगस्टपासून सणासुदीचा काळ वाढवणार भाव... ऑगस्टपासून सुरू होणारे रक्षाबंधन, जन्माष्टमी, गणेशोत्सव, नवरात्र आणि दिवाळीसारख्या सणांदरम्यान डाळी आणि खाद्यतेलाची मागणी वाढण्याची शक्यता आहे. जागतिक किमती आणि आयातीच्या खर्चात घट झाली नाही तर या दोन्ही वस्तूंच्या किमतींवर आणखी दबाव राहण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०६ ऑगस्ट २०२६


## नव्या जर्सीतून विजयी वाटचालीचा संकल्प; इकरा पब्लिक स्कूलमध्ये स्पोर्ट्स जर्सीचे अनावरण





**जळगाव :** क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण यशाची परंपरा अधिक भक्कम करण्याच्या उद्देशाने इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये U-14 आणि U-17/U-19 फुटबॉल संघांसाठी 2026–27 हंगामातील नवीन स्पोर्ट्स जर्सीचे अनावरण उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.शाळेचे चेअरमन डॉ.अब्दुल करीम सालार यांच्या हस्ते जर्सीचे अनावरण झाले.यावेळी शाळेचे प्राचार्य शेख शकील,क्रीडा शिक्षक आमिर खान तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.गेल्या दोन वर्षांत शाळेच्या ७५ विद्यार्थ्यांनी क्रीडा कोट्यातून ५ ते ७ अतिरिक्त गुण मिळवत उच्च शिक्षणाच्या संधी प्राप्त केल्या आहेत.तसेच जिल्हा, विभागीय,राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये इकरा पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.या यशामागील मेहनत,शिस्त आणि क्रीडासंस्कृतीचा गौरव करण्याबरोबरच आगामी स्पर्धांसाठी खेळाडूंमध्ये नवा आत्मविश्वास आणि जिद्द निर्माण करण्याच्या उद्देशाने या जर्सीचे अनावरण करण्यात आले.यंदाच्या जर्सीमध्येही प्रतीकात्मकता जपण्यात आली आहे. U-14 संघासाठी लाल रंगाची जर्सी ऊर्जा, धैर्य आणि आक्रमक खेळाचे प्रतीक आहे, तर U-17/U-19 संघासाठी निळ्या रंगाची जर्सी शिस्त, संयम,नेतृत्व आणि सांघिक भावनेचा संदेश देते.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.अब्दुल करीम सालार म्हणाले, "क्रीडा हे केवळ विजय-पराभवाचे माध्यम नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची प्रक्रिया आहे. जर्सी ही शाळेच्या सन्मानाची ओळख आहे.प्रत्येक खेळाडूने मैदानावर शिस्त, प्रामाणिकपणा आणि संघभावना जपत उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचा गौरव वाढवावा."प्राचार्य शेख शकील यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत,शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा क्षेत्रातही उच्च यश संपादन करण्याचे आवाहन केले.नवीन जर्सी परिधान करताच खेळाडूंमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून,आगामी शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये इकरा पब्लिक स्कूलचे संघ नव्या जोमाने आणि आत्मविश्वासाने मैदानात उतरतील,असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त तिसगाव शासकीय आश्रमशाळेत रक्तदान शिबिराचे आयोजन




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने आदिवासी विकास विभाग अंतर्गत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, तिसगाव (ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर) येथे रविवार, दि. 9 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 9.00 वाजता भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे."चला रक्तदान मोहीम राबवूया... रक्तदान करून जीव वाचवूया" या सामाजिक संदेशासह आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या रक्तदान शिबिराचे आयोजन मुख्याध्यापक व सर्व कर्मचारीवृंद, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा तिसगाव यांनी केले असून, दत्ताजी भाले रक्तकेंद्र, डॉ. हेडगेवार रुग्णालय, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने रक्त संकलन करण्यात येणार आहे.रक्तदान हे सर्वोच्च सामाजिक दान मानले जाते. एका रक्तदात्यामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे परिसरातील युवक, नागरिक, माजी विद्यार्थी व समाजसेवकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन शाळेतील मुख्याध्यापक डि.जी खालापुरे,डि एस परदेशी,,एस बी आर डोंगरे, ठाकुर एस पी मधे,धोंडकर,बी आर भावसार,लखन राठोड,आर एस राठोड,एम.पी सानप,श्रीहरी कांगणे (गृहपाल),रेखा लोखंडे,(नर्स)उज्वला गोळेगावकर,(मुलींच्या अध्यक्षीका)सुनिता माळी नफिसा सय्यद, नारायण सोनवणे,वैभव खिल्लारे,आदी आयोजकांनी केले आहे.

## सिद्धिविनायक देणगी घोटाळ्याची चौकशी!




**मुंबई :** देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मुंबईतील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरातील कथित देणगी घोटाळ्याची राज्य सरकारने अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाचे 'विशेष लेखापरीक्षण' करण्याचे अत्यंत महत्त्वाचे आदेश दिले आहेत. गेल्या ५ वर्षांत मंदिरात आलेल्या रोख देणग्या, सोने-चांदीचे दागिने आणि इतर मौल्यवान वस्तूंच्या हिशेबात मोठी अनियमितता असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे या सखोल चौकशीतून कोणते सत्य बाहेर येते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाचे अध्यक्ष आणि आमदार सदा सरवणकर यांनी मंगळवारी (४ ऑगस्ट) मंत्रालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या दोन नेत्यांमध्ये तब्बल २० मिनिटे चर्चा झाली. या बैठकीत मंदिरातील कथित आर्थिक अनियमितता आणि देणगी व्यवस्थापनावर सविस्तर खल झाला. यानंतर लगेचच ॲक्शन मोडमध्ये येत एकनाथ शिंदे यांनी अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता यांना या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आणि विशेष लेखापरीक्षणाचे निर्देश दिले आहेत.

या विशेष लेखापरीक्षणामध्ये प्रामुख्याने गेल्या ५ वर्षांच्या कालावधीत लक्ष केंद्रित केले जाणार आहे. या काळात मंदिरात जमा झालेली रोख रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने, मौल्यवान वस्तू आणि इतर सर्व प्रकारच्या अर्पणांचा बारकाईने तपास केला जाईल.

१.देणग्यांची नोंदवही आणि प्रत्यक्ष साठा यात काही तफावत आहे का?

२.आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता राखली गेली आहे का?

३.दागिन्यांचे व्यवस्थापन योग्य प्रकारे झाले आहे का?

या सर्व प्रश्नांची उत्तरे या चौकशीतून शोधली जाणार आहेत. संपूर्ण ऑडिट प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

सिद्धिविनायक मंदिर हे देशातील सर्वाधिक देणग्या मिळणाऱ्या आणि श्रीमंत देवस्थानांपैकी एक मानले जाते. त्यामुळे येथील आर्थिक व्यवहारात पारदर्शकता असणे अत्यंत गरजेचे आहे. या ऑडिट दरम्यान जर आर्थिक गैरव्यवहार, निधीचा अपहार किंवा नोंदींमध्ये कोणतीही तफावत आढळली, तर संबंधित दोषींवर अत्यंत कठोर कारवाई केली जाईल, असे सूत्रांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या या तडकाफडकी निर्णयामुळे आता मंदिर व्यवस्थापनाशी संबंधित वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, शासनाकडे सादर होणाऱ्या या अहवालात नेमके काय निष्पन्न होते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.